## महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि), पुणे
## शेतकरी उत्पादक कंपनी व खरेदीदार कंपनी यांचे सहभागाने (PPP-Mode)आयोजित पिक प्रात्यक्षिके आयोजनाची परीणामकारकता वाढविणेसाठी मार्गदर्शक सुचना

प्रस्तावना :

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि) यांचे मार्फत बाजारभिमुख कृषि विस्ताराच्या अनुषंगाने (Market Lead Extension) योजना राबविल्या जातात. त्यासाठी उत्पादन ते विक्री व्यवस्था या दरम्यान संपुर्ण मुल्यसाखळी विकासासाठी एकात्मीक योजना राबविणे आवश्यक आहे.जागतिक बँक प्रतिनिधी मा.श्री.पॉल सिंग सिधू (वरिष्ठ कृषि विशेषज्ञ) यांनी केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे, तसेच जागतिक बँक टास्क टिम लिडर मा.श्री. मनिवनंन पॅथी यांच्या दिनांक ०७/०२/२०१७ रोजीच्या आढावा सभे प्रमाणे, झालेल्या चर्चे नुसार, एमएसीपी प्रकल्प हा अंतिम टप्पावर असून त्याचे मुल्यमापन Implementation Completion and Results Reports (ICRR) यांचे मार्फत करण्यांत येणार आहे. यासाठी सन २०१७-१८ ची प्रात्यक्षिके तांत्रीक दृष्ट्या परिणामकारक व उत्पादित होणारा शेतमाल शेतकरी उत्पादक कंपनीने विक्री व्यवस्थापन विचारात घेऊन पी.पी.पी. पध्दतीने राबवावयाची आहेत. यासाठी खरेदीदार यांची निवड प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या सहाय्याने करावयाची आहे. तसेच शेतकरी उत्पादक कंपनी चे प्रात्यक्षिक भागधारक, खरेदीदार कंपनी यांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्यासमोर एम.ओ.यु. (Memorandum of Understanding) निश्चित करावयाची आहे.तसेच शेतकरी उत्पादक कंपनीने प्रकल्प संचालक, आत्मा यांना प्रात्यक्षिक राबविण्याबाबत लेखी हमीपत्र द्यावयाचे आहे.यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यांत येत आहेत.

१)पीपीपी पिक प्रात्यक्षिके आयोजनाची उद्दीष्ट्ये-

१) पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी सुधारीत तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्या तंत्रज्ञानाची परीणामकारकता दाखविणे व तंत्रज्ञानाचा अवलंब इतर शेतक-यांनी करणे.
२) प्रात्यक्षिकात अवलंबवावयाचे तंत्रज्ञान निश्चित करणे.
३) एकात्मीक कृषि विकास व पर्यायी पणन व्यवस्थेसाठी शेतकरी उत्पादक कंपन्या मार्फत, शेतमालाचे एकत्रीकरण, स्वच्छता, प्रतवारी व पॅकिंग करून पर्यायी पणन व्यवस्था निश्चित करणे.
४) एकात्मीक पिकाची मूल्यसाखळी (Value Chain Development) विकसीत करणे.
५) व्यापारक्षम शेतीला प्रोत्साहन देणे.
६) प्रात्यक्षिक आयोजना नंतरच्या वर्षामध्ये प्रात्यक्षिकात दाखविलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब केवळ प्रात्यक्षिक आयोजीत केलेल्याच नव्हे तर आजुबाजुच्या शेतक-यांनी करणे अपेक्षित आहे.
७) सर्वात महत्वाचे म्हणजे परीसरातील शेतक-यांच्या उत्पादनात आणि निव्वळ उत्पन्नात वाढ करणे.
८) खाजगी व सार्वजनिक क्षेत्राकडून विकसीत तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकाची उत्पादकता वाढविणे.
९) पिकनिहाय सध्याची उत्पादकता तसेच अपेक्षित २० टक्के उत्पादकता वाढ यासाठी माती परिक्षण आधारित (Soil Testing Based) तंत्रज्ञानाचा अवलंबन करणे. सदर तंत्रज्ञानाची निश्चिती कृषि विद्यापिठ व कृषि विज्ञान केंद्र यांच्या लेखी शिफारशी प्रमाणे करणे.

२) पिक प्रात्यक्षिकामध्ये खालील तंत्रज्ञानाचा समावेश करण्यांत यावा.

१) पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिकामध्ये खरेदीदार कंपनी यांचेशी चर्चा करून, योग्य वाणांची निवड करणे.

२) माती परीक्षणावर आधारीत, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन (INM), संकल्पनेनुसार सेंद्रीय, जैविक आणि रासायनिक खते, सुक्ष्म मुलद्रव्यांचा वापर, खतांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी योग्य पध्दतीने खत देणे आणि पिकाच्या ठराविक अवस्थेत ठराविक मात्रामध्ये खत व पाणी देणे.

३) पेरणीची योग्य वेळ, बियाण्याचे हेक्टरी योग्य प्रमाण, पेरणीचे योग्य अंतर आणि हेक्टरी रोपांची संख्या निश्चित करणे.

४) एकात्मिक किड-रोग व्यवस्थापन (IPM), तण नियंत्रण, मुलस्थानी जलसंधारण, संरक्षित सिंचन, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर (ठिंबक / तुषार सिंचन इ. )

५) पेरणीसाठी जमिन तयार करण्या पासून, योग्यवेळी पिकाच्या काढणीपर्यंत एकात्मिक पिक व्यवस्थापनाचे अवलंबन करणे.

३) पीपीपी पिक प्रात्यक्षिक अंमलबजावणीच्या अटी व शर्ती :-

१) पिक प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी आत्मा यंत्रणा, शेतकरी उत्पादक कंपनी व खाजगी खरेदीदार कंपनी यांच्या सहभागाने पी.पी.पी. तत्वावर राबविण्यांत यावीत.

२) पिक प्रात्यक्षिकांसाठी लाभार्थी म्हणून फक्त प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यांत आलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी व कंपनीचे भागधारक शेतकरी यांचीच निवड करण्यांत यावी.

३) प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्यापूर्वी खरेदीदार कंपनी / प्रक्रियादार / निर्यातदार यांची निवड करण्यांत यावी.

४) वरील प्रमाणे निवड केलेल्या लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी व खरेदीदार कंपनी / प्रक्रियादार / निर्यातदार यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यांत यावा. (सोबत प्रपत्र)

५) प्रकल्प संचालक, आत्मा यांनी शेतकरी उत्पादक कंपनी यांचेशी चर्चा करून प्रकल्प अहवाल (लघु विस्तार प्रकल्प) निश्चित करण्यांत यावा. यामध्ये कृषि निविष्ठा, तंत्रज्ञान, शेतीदिन, पिक कापणी प्रयोग व विक्री व्यवस्थापन या बाबींचा समावेश करावा व सदर बाबीसाठी आवश्यक आर्थिक तरतूद करावी. प्रकल्प अहवालामध्ये एमएसीपी प्रकल्पाचा वाटा, शेतकरी उत्पादक कंपनीचा वाटा व खरेदीदार कंपनीचा सहभाग निश्चित करण्यांत यावा.

६) आवश्यक निविष्ठांची खरेदी प्राधान्याने कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, शासकीय प्रयोगशाळा इ. मार्फत करावी. तसेच बीयाणे खरेदी प्राधान्याने महाबीज, एन.एस.सी., कृषि विद्यापीठ यांचे कडून करण्यांत यावी.

७) शेतकरी उत्पादक कंपनी यांनी गुणवत्तापुर्ण, बाजार भावापेक्षा कमी व वाजवी दराने, योग्य पध्दतीचा अवलंब करून निविष्ठा खरेदी करण्यांत याव्यात.

८) पिक प्रात्यक्षिक आयोजनासाठी संपादित केलेल्या निविष्ठा संबंधीत लाभार्थी पर्यंत वेळेत पोहोच करण्याची सर्वस्वी जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपनीची राहील. व त्यांचे दस्त प्रकल्प संचालक, आत्मा यांचे कार्यालयात जतन करण्यांत यावेत.

९) एका कंपनीसाठी एक लघु विस्तार प्रकल्प तयार करण्यांत यावा, तसेच खरेदीदाराच्या मागणी प्रमाणे, एकाच वाणाची निवड करण्यांत यावी.

१०)जागतिक बँकेच्या रिझल्ट फ्रेम वर्क इंडिकेटरनुसार,पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन खालील पिकांमध्ये करणे बंधनकारक आहे.

सोयाबिन, तुर, भात, हरभरा, मका, टोमॅटो, कांदा, मिरची

४) आत्मा यंत्रणेच्या जबाबदा-या व कर्तव्ये :-

१) लघु विस्तार प्रकल्प तयार करतांना त्या भागांचे पिक निहाय क्षेत्र, उत्पादन, उत्पादकता यांची आकडेवारी घेण्यात यावी.ती प्रकल्पा सोबत जोडावी. तसेच पिक प्रात्यक्षिके घेतांना पिकनिहाय सध्याची उत्पादकता तसेच अपेक्षित २० टक्के उत्पादकता वाढ एवढा लक्षांक निश्चीत करणे.

२) शेती दिनांचे आयोजन करणे. त्यासाठी आवश्यक निधी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी लघु कृषि विस्तार प्रकल्पामध्ये समाविष्ट करावा.(रू.१०,०००/- प्रती कंपनी)

३) उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पणन तज्ञ, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व सहाय्यक तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी पीपीपी पिक प्रात्याक्षिकांना वेळोवेळी भेटी देवुन मार्गदर्शन करावे, तसेच ए.टी.एम., बी.टी.एम. व ए.एम.ई. यांनी प्रात्यक्षिकांची उत्पादन, उत्पादकता व शेतकरी भेटी याबाबतची अत्यावश्यक आकडेवारी अद्यावत ठेवावी व वेगवेगळया पिक स्तरावरती फोटोग्राफ घ्यावेत.तसेच पिक काढणी वेळेस उपस्थित राहावे.

५) शेतकरी उत्पादक कंपनीची जबाबदारी व कर्तव्ये :-

१) शेतकरी उत्पादक कंपनी भागधारक यांच्या मधुन लाभार्थ्यांची निवड करावी. योजनेची अंमलबजावणी करताना समाजातील कमकुवत वर्गाला म्हणजेच अनुसूचित जाती-जमाती (२२%), स्त्रिया (३०%), अल्प-अत्यल्प भुधारक यांना पुरेशा प्रमाणात लाभ देण्याची सुचना सर्वप्रथम लक्षात घ्यावी.

२) कंट्रोल प्लॉट घेतलेल्या शेतक-यांची माहितीचे स्वतंत्र रजिस्टर अद्यावत ठेवावे.

३) एका कंपनी सदस्याला एकाच प्रात्यक्षिकांचा लाभ द्यावा.

४) खरेदीदार कंपनीकडुन शेतकरी उत्पादक कंपनीने घेतलेल्या बियाण्याबाबत काही तक्रार आल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी संबंधीत बियाणे कंपनी व शेतकरी उत्पादक कंपनी यांची राहील.

५) बियाणे खरेदी करताना बियाण्याच्या पावत्या व लॉट नंबर सह सर्व माहिती नमुद असावी, या पावत्या जतन करण्यांत याव्यात.

६) ज्या शेतकरी उत्पादक कंपनी पीपीपी पिक प्रात्यक्षिक न राबविता अनुदानाचा लाभ घेतील त्यांचे कडून सदरची रक्कम वसूल करण्यांत येईल. (सोबत हमीपत्र)

७) पीपीपी पिक प्रात्यक्षिके दिलेल्या लाभार्थीचे माहिती (नाव, प्रवर्ग, शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव, आधार कार्ड, बँक खाते क्रमांक, लाभार्थी क्षेत्र, प्रात्यक्षिक भेटी दिलेल्या शेतक-यांचे नाव, वेगवेगळया पिक स्तरावर घेतलेले फोटोग्राफ, इ.) आवश्यक माहितीच्या नोंदीचे रजिस्टर शेतकरी उत्पादक कंपनी यांनी अद्यावत ठेवावे व प्रकल्प संचालक, आत्मा यांनी सदर रजिस्टर महिन्यातुन दोन वेळेस सही व शिक्का मारुन तपासणी करावी.

८) खरेदीदाराच्या मागणी नुसार, उत्पादित कृषि मालाचे स्वच्छता, प्रतवारी व आवश्यक त्या पॅकींग साईज मध्ये शेतमालाचा पुरवठा करणे.

६) खरेदीदार कंपन्यांची (Procurement Company) जबाबदारी व कर्तव्ये :-

१) पेरणीपुर्व व काढणीपुर्व शेतकरी उत्पादक कंपनीचे भागधारक शेतकरी, लाभार्थी, कंपनीचे मॅनेजर, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण योग्य वेळी घेणे.

२) खरेदीदार कंपनी यांनी सनियंत्रण व विस्तार विषयक सेवा प्रदान कराव्यात.

३) खरेदीदार कंपनीने एखाद्या पिकाचा विशिष्ट वाण दिल्यास या वाणाचे संपुर्ण तंत्रज्ञान, कृषि पध्दती (Agriculture Practices), पाण्याचे व्यवस्थापन, निविष्ठा बाबत माहिती इत्यादी लेखी स्वरूपात उपलब्ध करून द्यावे.

७) पीपीपी प्रकल्पातील प्रमुख बाबी :-

एका शेतकरी उत्पादक कंपनीसाठी एक लघु विस्तार प्रकल्प तयार करण्यांत यावा, तसेच खरेदीदाराच्या मागणी प्रमाणे, एकाच वाणाची निवड करण्यांत यावी. याघटकाचा उद्देश केवळ उत्पादकता वाढ नव्हे तर संपुर्ण मुल्य साखळी विकसीत करून, उत्पादन ते विक्री तत्वावर खरेदीदार कंपन्यांचा सहभाग या प्रकारची प्रात्यक्षिके राबविण्यांत यावीत.

अ) एमएसीपी प्रकल्पांतर्गत निविष्ठा आराखडा तयार करताना खालील बाबींचा समावेश करावा-
पिक निहाय तंत्रज्ञान व निविष्ठा हे विद्यापीठाचे शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र व खरेदीदार कंपनी यांचे कडून लेखी निश्चीत करून घ्यावी व त्यांचे शिफारशी नुसार निविष्ठा आराखडा तयार करावा.

ब) पिक प्रात्याक्षिक खर्च मर्यादा :-

| अ.क | पिक प्रात्यक्षिक | प्रति शेतकरी प्रात्यक्षिकांचे क्षेत्र (हे.आर.) | एमएसीपी देय अनुदान प्रति प्रात्यक्षिक (रू.) |
|---|---|---|---|
| १ | तृणधान्य | ०.४० | ६,०००/- |
| २ | कडधान्य | ०.४० | ७,०००/- |
| ३ | गळितधान्य | ०.४० | ८,०००/- |
| ४ | भाजीपाला | ०.२० | ७,०००/- |

८) लघू विस्तार प्रकल्प तयार करणे व मंजुरी :-

एका शेतकरी उत्पादक कंपनीसाठी एक लघु विस्तार प्रकल्प कृषि पणन तज्ञ यांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करावा(सोबत प्रपत्र). कृषि विस्तार लघु प्रकल्प सोबत दिलेल्या प्रपत्रा नुसार तयार करावेत आणि ते जिल्हा स्तरावर संकलीत करावेत.लघु विस्तार प्रकल्पांला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रकल्प संचालक, आत्मा देतील.तसेच त्यांची एक प्रत मा.संचालक, आत्मा, कृषि आयुक्तालय, पुणे यांना सादर करावी व एक प्रत नोडल अधिकारी, पी.आय.यु.(कृषि), एम.ए.सी.पी, पुणे कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

९) शेतकरी उत्पादक कंपनीस अनुदान वितरण :-

पिक प्रात्यक्षिकांचे आयोजनासाठी अंतिम करण्यांत आलेल्या मंजूर लघु विस्तार प्रकल्पानुसार, शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत जागतिक बँकेचे मार्गदर्शक सुचने नुसार, प्रकल्प राबविण्यांत येईल. संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनीने निविष्ठा आराखड्या प्रमाणे, निविष्ठा खरेदी करावी. निविष्ठा खरेदी पुर्ण झाल्याची तपासणी प्रकल्प संचालक, आत्मा यांचे मार्फत करण्यांत येईल. त्यानुसार या प्रकल्पांतर्गत निविष्ठासाठी मंजूर असलेले देय अनुदान प्रतिपुर्ती स्वरूपात प्रकल्प संचालक, आत्मा यांचे मार्फत कोणताही विलंब न करता शेतकरी उत्पादक कंपनीच्या बँक खात्यावर (RTGS व्दारे) वर्ग करण्यांत येईल.

१०) प्रात्यक्षिकांचे कंट्रोल प्लॉट आयोजन

प्रति १० एकर मागे १ कंट्रोल प्लॉट ठेवणे बंधनकारक आहे. तथापि प्रात्यक्षिकांचे आयोजन समुह पध्दतीने (Cluster approach) केले जाणार असल्याने दहा शेतक-यांमागे एक कंट्रोल प्लॉट ठेवावा. कंट्रोल प्लॉट व पिक प्रात्यक्षिक प्लॉट घेतलेल्या शेतक-यांच्या माहितीचे स्वतंत्र रजिस्टर शेतकरी उत्पादक कंपनी व प्रकल्प संचालक, आत्मा यांनी अद्यावत ठेवावे. व कृषि विभागांच्या पिक कापणी प्रयोग मार्गदर्शक सुचनेचा अवलंब करुन पिक कापणी प्रयोग घेण्यात यावेत.

११) शेती दिनाचे आयोजन-

प्रकल्प संचालक, आत्मा यांनी एका कंपनीसाठी एक या प्रमाणे (रू.१०,०००/- चे मर्यादेत) शेतीदिनाचे आयोजन करावे. त्यासाठी आवश्यक निधी (रू.१०,०००/- प्रती कंपनी), लघु विस्तार प्रकल्पामध्ये समाविष्ठ करण्यांत यावा. शेती दिनाच्या माहितीची स्वतंत्र नोंदवही आत्मा कार्यालयात जतन करण्यांत यावी.

१२) पिक कापणी प्रयोग-

कृषि विभागांच्या पिक कापणी प्रयोग मार्गदर्शक सुचनेचा अवलंब करुन पिक कापणी प्रयोग घेण्यात यावेत. पिक कापणी प्रयोग करणा-या अधिकारी / कर्मचारी यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण प्रकल्प संचालक, आत्मा यांनी आयोजित करावे. पिक कापणी प्रयोग १० शेतक-यांच्या पाठीमागे एक, त्यामध्ये रॅन्डम पध्दतीचा वापर करून निवड करावी. पिक कापणी प्रयोगासाठी प्रकल्प संचालक, प्रकल्प उपसंचालक, कृषि पणन तज्ञ, बी.टी.एम., ए.टी.एम. यांनी स्वतः हजर राहून पिक कापणी प्रयोग करावेत. त्यावेळी इतर शेतकरी यांनासुध्दा हजर ठेवावे. त्याचे छायाचित्र घेऊन आलेल्या उत्पादनाची नोंद, नोंदवहित घेणे बंधनकारक राहील.

१३) प्रात्यक्षिकांच्या यशाचे मुल्यमापन-

जागतिक बँकेच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे, पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिकाचे मुल्यमापन जागतिक बँकेने नेमलेली त्रयस्थ संस्था पी.डब्ल्यु.सी. (PWC) करणार आहे.प्रकल्प मुल्यमापन अहवाल तयार करताना, Implementation Completion and Results Reports (ICRR)यांचे मार्फत स्वतंत्र मुल्यमापन अहवाल सादर करण्यांत येणार आहे. मुल्यमापनासाठी खालील बाबीचे अद्यावत रेकॉर्ड व्यवस्थित जतन करून ठेवणे, बंधनकारक राहील.

- प्रात्यक्षिकामुळे पिक उत्पादकतेत झालेली वाढ.
- कंट्रोल प्लॉट च्या तुलनेत पिक प्रात्यक्षिक प्लॉट मध्ये झालेली उत्पादनात वाढ.
- वापरण्यांत आलेले तंत्रज्ञान.
- पीपीपी प्रकल्पामुळे प्रती क्विंटल शेतमालाचे झालेले मुल्यवर्धन.
- शेतकरी उत्पादक कंपनी यांनी प्रात्यक्षिक आयोजनाच्या नंतरच्या वर्षामध्ये प्रात्यक्षिकात दाखविलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब किती शेतक-यांनी केला याची माहिती संकलीत करावी.
- पिकाच्या विविध वाढीच्या अवस्थेतील छायाचित्र संकलन.

१४) पिक प्रात्यक्षिक तपासणी अहवाल -

पिक प्रात्यक्षिक तपासणी अहवालासाठी सोबत प्रपत्र जोडण्यांत आलेली आहेत. तपासणी अधिकारी (प्रकल्प संचालक आत्मा / प्रकल्प उपसंचालक आत्मा-१व२) यांनी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर तपासणी व मार्गदर्शन करून, नमुद केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनीतील सभासद शेतकरी प्रात्यक्षिक प्रक्षेत्राची तांत्रिक तपासणी व मार्गदर्शन करावे, तसेच प्रात्यक्षिकांबाबत तपासणी अधिकारी यांनी दिनांक व स्वाक्षरीसह अभिप्राय नोंदवावेत. कृषि पणन तज्ञ, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी १००% प्रात्यक्षिकांची तपासणी व मार्गदर्शन करावे. अन्य कर्मचारी / अधिका-यांनी कृषि विभागाच्या प्रचलित मापदंडानुसार, तपासणी करावी.

संचालक, आत्मा,
कृषि आयुक्तालय,पुणे.

------------------------------ooooooooooo------------------------------

जा.क्रं./एमएसीपी/पीआययु(कृषि)/PPP-पीक प्रात्यक्षिक/६५९/१७
दिनांक :-१५/०५/२०१७.

प्रति,

१) मा. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. प्रकल्प संचालक, एमएसीपी, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा. संचालक, वनामती, नागपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) विभागीय कृषि सहसंचालक(सर्व), यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व), यांना सुचित करण्यांत येते की, उपरोक्त मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून आपल्या जिल्ह्यात सदर घटकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यांत यावी.

## प्रपत्र - ३

## लघु कृषि विस्तार प्रकल्प - पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिके

जिल्हा ____________________

पिकांचे नाव -

घेण्यात आलेला वाणांचा प्रकार -

प्रकल्पाच्या जबाबदार BTM चे नांव-

संबधित सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापकाचे नांव-

तालुका आणि उपविभाग -

१) प्रस्तावना - प्रकल्पाची पार्श्वभूमी / बेसलाईन सर्व्हे / डेटा

२) प्रकल्पाचे कार्य क्षेत्र- शेतकरी उत्पादक कंपनी गांव तालुका जिल्हा

३) प्रकल्पाची उद्दिष्टे-

४) प्रकल्पात समाविष्ट शेतकरी उत्पादक कंपनीतील सदस्य संख्या–

| अ.क्र. | शेतकरी नाव | कंपनीचे नाव | गाव | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |

५) तंत्रज्ञान वापरातील उणीवांचे विश्लेषण

| अ.क्र. | तंत्रज्ञानाची बाब | आढळुन आलेल्या तंत्रज्ञानातील उणीवा (Identified Gap) | तंत्रज्ञानातील उणीवा भरुन जास्त उत्पादन घेण्यासाठी शिफारस | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यापीठ | बियाणे कंपनी | इतर |
| १ | मातीपरीक्षण | | | | |
| २ | मुलस्थानी जलसंधारण | | | | |
| ३ | सुधारीत बियाणे वापर | | | | |
| ४ | बिज प्रक्रीया | | | | |
| ५ | रासायनिक खतांचा वापर | | | | |
| ६ | प्रति हेक्टर बियाणे वापर | | | | |
| ७ | पेरणीचे अंतर | | | | |
| ८ | प्रति हेक्टरी रोपांची संख्या | | | | |
| ९ | पिक संरक्षण | | | | |
| १० | सिंचन | | | | |
| ११ | सेंद्रीय खतांचा वापर | | | | |
| १२ | माती परीक्षणांवर आधारित सुक्ष्म मुलद्रव्यांचा वापर | | | | |
| १३ | प्रशिक्षण | | | | |
| १४ | इतर बाबी | | | | |

२०)

६) तंत्रज्ञान व त्यासाठी येणारा खर्च-

| अ.क्र | शिफारस केलेली तांत्रिक बाब | आवश्यक एकुण रक्कम | शेतकरी उत्पादक कंपनी स्वहिस्सा | खरेदीदार कंपनी हिस्सा | एमएसीपी प्रकल्पअनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मातीपरीक्षण | | | | |
| २ | सुधारीत बियाणे वापर | | | | |
| ३ | बिज प्रक्रीयासाठी आवश्यक जैविक खते | | | | |
| ४ | पेरणीचे अंतर | | | | |
| ५ | बी बी एफ द्वारे पेरणी | | | | |
| ६ | प्रति हेक्टरी रोपांची संख्या | | | | |
| ७ | प्रति हेक्टरी बियाणे वापर | | | | |
| ८ | माती परीक्षणांवर व पिका नुसार आवश्यक रासायनिक खतांचा वापर (NPK) | | | | |
| ९ | माती परीक्षणांवर आधारित आवश्यक सुक्ष्ममुलद्रव्यांचा वापर | | | | |
| १० | सेंद्रीय खतांचा वापर | | | | |
| ११ | मुलस्थानी जलसंधारण (मृतसरी काढणे) | | | | |
| १२ | सिंचन | | | | |
| १३ | पाणी उपलब्धेतेनुसार पिकांना देण्यात आलेल्या पाण्याची वेळ (Crop Stage) | | | | |
| १४ | पिक संरक्षण | | | | |
| १५ | प्रशिक्षण | | | | |
| १६ | शेती दिन | | | | |
| १७ | इतर बाबी | | | | |

कृषि पणन तज्ञ    प्रकल्प उपसंचालक, आत्मा-2    प्रकल्प संचालक, आत्मा

28

# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि), पुणे

## प्रपत्र-४

## पी.पी.पी.पिक प्रात्यक्षिक तपासणी अहवाल

१) गाव- तालुका- जिल्हा-

२) शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव –

३) लाभार्थी शेतक-यांचे नाव -

४) प्रात्यक्षिक आयोजनाचा हंगाम- वर्ष-

५) पिकाचे नाव - वाणांचे नाव -

६) अधिकारी / कर्मचारी - सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक -
तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक -
कृषि पणन तज्ञ -

७) लघु कृषि विस्तार प्रकल्प केला आहे काय?

८) तांत्रिक बाबी -

| अ.क्र | लघु कृषि विस्तार प्रकल्पा प्रमाणे शिफारस केलेली तांत्रिक बाब | तंत्रज्ञान वापरले आहे का? होय/नाही | तंत्रज्ञान वापरले नसल्याचे कारण | भेटी देणा-या अधिका-यांचे मार्गदर्शक सुचना / अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मातीपरीक्षण | | | |
| २ | सुधारीत बियाणे वापर | | | |
| ३ | बिज प्रक्रीयासाठी आवश्यक जैविक खते | | | |
| ४ | पेरणीचे अंतर | | | |
| ५ | बी बी एफ द्वारे पेरणी | | | |
| ६ | प्रति हेक्टरी रोपांची संख्या | | | |
| ७ | प्रति हेक्टरी बियाणे वापर | | | |
| ८ | माती परीक्षणांवर आधारित आवश्यक रासायनिक खतांचा वापर (NPK) | | | |
| ९ | माती परीक्षणांवर आधारित आवश्यक सुक्ष्ममुलद्रव्यांचा वापर | | | |
| १० | सेंद्रीय खतांचा वापर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | मुलस्थानी जलसंधारण | | | |
| १२ | सिंचन | | | |
| १३ | पाणी उपलब्धेतेनुसार पिकांना देण्यात आलेल्या पाण्याची वेळ (Crop Stage) | | | |
| १४ | पिक संरक्षण | | | |
| १५ | प्रशिक्षण | | | |
| १६ | शेती दिन | | | |
| १७ | इतर बाबी | | | |

तपासणी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी -
नाव -
पदनाम -
दिनांक -

## महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (कृषि), पुणे

**प्रपत्र—५**

## पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक क्षेत्रीय तपासणी अहवाल

पिक - तालुका- जिल्हा- तपासणी दिनांक- शे.उ.कं. नाव -

| अ क्र | शेतकऱ्याचे नाव | गाव | प्रात्यक्षिकाचे क्षेत्र | पेरणी दिंनाक | सुधारित/संकरित बियाण्याच्या जातीचा वापर केला आहे काय? (जातीचे नाव) | अनुदानीत निविष्ठा वेळेत मिळाल्या काय? | विना अनुदानीत निविष्ठा शिफारशी प्रमाणे वापरल्या आहेत काय? | पेरणीचे अंतर योग्य आहे काय? | प्रति हे. रोपांची संख्या योग्य आहे काय? | माती परीक्षणानुसार व INM तंत्रानुसार खतांचा वापर केला आहे काय? NPK/ सुक्ष्ममुलद्रव्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

26

| पिक संरक्षणासाठी IPMतंत्रवापरतात काय? | पाणी वापर कार्यक्षमतेने केला आहे काय? (ठिबक/तुषार) | पिकांच्या सर्वेदनशील अवस्थेत संरक्षित पाणी दिले काय ? पाणी देणाच्या तारखा व पिकांची अवस्था | उत्पादन वाढीच्या मोजणीसाठी नियंत्रण प्लॉट आहे काय? | शेतकऱ्याचे सुधारीत तंत्रज्ञान विषयक ज्ञान पुरेसे आहे काय? | काढणीपश्चात तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यास माहीती आहे काय? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १३ | १४ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |



25

प्रति,

मा. प्रकल्प संचालक,

आत्मा, जि.

## हमीपत्र

आम्ही . . . . . . . . . . . . (कंपनीचे नांव) पत्ता . . . . . . . . या हमीपत्राव्दारे असे लिहून देतो की, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत, पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिकांचे आयोजनासाठी आमच्या कंपनीची निवड करण्यांत आलेली आहे.

सदर पिक प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी ही मार्गदर्शक सुचनांचे अधिन राहून करण्यास आम्ही तयार आहोत. तसेच मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास आमची कंपनी कार्यवाहीस पात्र ठरेल. मार्गदर्शक सुचने मधील नियमांचे पालन न झाल्यास कंपनी मार्फत पी.पी.पी. पिक प्रात्यक्षिक अंमलबजावणीची संपुर्ण रक्कम वसुल करण्यांत येईल याची आम्हाला जाणीव आहे व त्यास आम्ही तयार आहोत.

पीपीपी पिक प्रात्यक्षिकांचे आयोजनासाठी निर्गमित मार्गदर्शक सुचना व एमएसीपी प्रकल्पा मार्फत वेळो-वेळी निर्गमित करण्यांत येणा-या सुचनांचे आम्ही काटेकोरपणे पालन करू, अशी लेखी हमी याव्दारे देण्यांत येत आहे.

स्थळ :-

दिनांक :-

| | | |
|---|---|---|
| नांव व सही<br>सचिव<br>शे.उ.कं. | नांव व सही<br>संचालक<br>शे.उ.कं. | नांव व सही<br>चेअरमन / अध्यक्ष<br>शे.उ.कं. |

समक्ष

| | | |
|---|---|---|
| सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक<br>आत्मा, | तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक<br>आत्मा, | कृषि पणन तज्ञ<br>आत्मा, एमएसीपी |

(सदर हमीपत्र रू.१०० चे स्टॅम्प पेपरवर देणे बंधनकारक राहील)